# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**


## कृषी विज्ञान संकुल काष्टी मालेगाव येथे शिवजयंती कार्यक्रम उत्साहात साजरा

कृषी विज्ञान संकुल मालेगाव अंतर्गत कार्यरत सर्व महाविद्यालय व कृषी तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 19 फेब्रुवारी 2023 रोजी 393 वी शिवजयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते श्री ऋषिकेश गोसावी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी व्यासपीठावर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचेअधिष्ठाता सहयोगी अधिष्ठाता डॉ विश्वनाथ शिंदे, नोडल अधिकारी डॉ सुरेश थोरात प्रा. विवेक कानवडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संजय पाटील विद्या शाखाप्रमुख डॉ दिनेश बिरारी, कुल मंत्री डॉ भगवान देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री.रवींद्र खैरनार उपस्थित होते.

याप्रसंगी शिवव्याखाते श्री. ऋषीकेश गोसावी यांनी त्यांच्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळांच्या सहकार्याने स्वराज्य निर्मिती केल्या बाबतची माहिती आपल्या भाषण शैलीत श्रोत्यांना विशद केली आणि त्यातून विद्यार्थ्यांना कशी प्रेरणा घेता येईल व जास्तीत जास्त अभ्यास करून कशाप्रकारे आपण आपल्या आयुष्यात उंच शिखरावर पोहोचू आणि आपल्या देशाचे नाव उज्वल करू शकतो ही माहिती दिली. डॉ. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची महती विषद केली आणि त्यातून आपण कसा बोध घ्यावा हे समजावून सांगितले. यावेळी कृषी विज्ञान संकुलाच्या प्रांगणात शोभा यात्रा काढण्यात आली.

कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान संकुल अंतर्गत कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि कृषी तंत्रनिकेतन या सहाही महाविद्यालयाचे सर्व अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनात कृषी विज्ञान संकुलन विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता.



## KVS NEWS



बुधवार दि.२२ फेब्रुवारी २०२३ 02

# कृषी विज्ञान संकुल येथे शिवजयंती कार्यक्रम उत्साहात



**मालेगाव ।** कृषी विज्ञान संकुल मालेगाव अंतर्गत कार्यरत सर्व महाविद्यालय व कृषी तंत्रनिकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवव्याख्याते ऋषिकेश गोसावी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी व्यासपीठावर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे अधिष्ठाता सहयोगी अधिष्ठाता डॉ.विश्र्वनाथ शिंदे, नोडल अधिकारी डॉ.सुरेश थोरात प्रा. विवेक कानवडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संजय पाटील विद्या शाखाप्रमुख डॉ.दिनेश बिरारी, कुल मंत्री डॉ.भगवान देशमुख, सहाय्यक कुलसचिव रवींद्र खैरनार उपस्थित होते.

याप्रसंगी शिवव्याखाते गोसावी यांनी त्यांच्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळांच्या सहकार्याने स्वराज्य निर्मिती केल्या बाबतची माहिती आपल्या भाषण शैलीत श्रोत्यांना विशद केली आणि त्यातून विद्यार्थ्यांना कशी प्रेरणा घेता येईल व जास्तीत जास्त अभ्यास करून कशाप्रकारे आपण आपल्या आयुष्यात उंच शिखरावर पोहोचू आणि आपल्या देशाचे नाव उज्वल करू शकतो ही माहिती दिली. डॉ. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची महती विषद केली आणि त्यातून आपण कसा बोध घ्यावा हे समजावून सांगितले. यावेळी कृषी विज्ञान संकुलाच्या प्रांगणात शोभा यात्रा काढण्यात आली.

कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान संकुल अंतर्गत कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि कृषी तंत्रनिकेतन या सहाही महाविद्यालयाचे सर्व अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनात कृषी विज्ञान संकुलन विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता.